महिला प्रधान क्षेत्रीय बचत योजना (MPKBY) अभिकर्ते नेमणूकी बाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
अल्पबचत संचालनालय, नवीन प्रशासन भवन,
८ वा मजला, मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक अबवि/प्र. क्र.१/०६/अब(विकास), दिनांक ३ जानेवारी २००५.

वाचा-(१) शासन परिपत्रक क्रमांक अबवि-१०९९/प्र.क्र.११५(विकास) दिनांक ७.९.१९९९.
(२) भारत सरकार, अर्थ मंत्रालय, अतिरिक्त सचिव (अर्थ) अर्धशासकीय पत्र. क्र.२/१/२००१/NS-१, दिनांक १८.११.२००२.

**प्रस्तावना**

अल्पबचत योजने अंतर्गत ३ प्रकारचे एजंट कार्यरत आहेत, त्यापैकी अल्पबचत महिला प्रधान एजंटांचे नेमणूकीचे व नुतनीकरणाचे अधिकार यापूर्वी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय बचत संघटनेच्या प्रादेशिक कार्यालयाकडे तसेच राज्य शासनाच्या अल्पबचत संचालनालयाकडे होते. भारत सरकार, अर्थ मंत्रालय, अतिरिक्त सचिव (अर्थ), अर्धशासकीय पत्र. क्र. २/१/२००१/NS-१, दिनांक १८.११.२००२. अन्वये दिनांक १.२.२००३ पासून अल्पबचत व महिला प्रधान एजन्सी नेमणूकीचे सर्व अधिकार राज्य शासनाकडे आलेले आहेत. यावाबत एजंटांच्या नेमणूकी बाबत अटी व पात्रता यांचे निकष तयार करणे शासनाच्या विचाराधिन होते. याबाबत शासन स्तरावर महिला प्रधान क्षेत्रीय बचत योजना (MPKBY) च्या एजन्सी बाबत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय-**

१ नेमणूक अधिकारी
१. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी हे नेमणूक अधिकारी असतील तथापि जिल्हाधिकारी हे अधिकार सहाय्यक संचालक अल्पबचत यांना प्रदान करु शकतील.
२. ठाणे - पुणे जिल्हयाचे बाबतीत सदर अधिकार उपसंचालक, अल्पबचत यांना जिल्हाधिकारी प्रदान करु शकतील.
३. बृहन्मुंबईतील क्षेत्रासाठी सहसंचालक अल्पबचत (बृहन्मुंबई) हे नेमणूक अधिकारी असतील.
४. नेमणूक अधिकाऱ्यास एजन्सी नुतनीकरणाचे व रद्द करण्याचे अधिकार असतील

A:\MPKBY-GR.doc

जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार
दि. १५-१-०५
ब. क्र. सहा. संचालक

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५. | संपुर्ण राज्यात नवीन महिला प्रधान तसेच विद्यमान सर्व महिला प्रधान अभिकर्त्यांच्या नियुक्ती / नुतनीकरण / पुनःजारीकरण / एजन्सी रद्द करणे याबाबतच्या अर्जावर संबधीत कार्यक्षेत्रातीलच अल्पबचत अधिकारी / सहाय्यक संचालक, अल्पबचत यांच्या शिफारशी असणे बंधनकारक राहील. |
| २. | शैक्षणीक पात्रता | १ | म. न. पा. क्षेत्रात किमान १२ वी पास किंवा समकक्ष परिक्षा पास. |
| | | २ | इतर क्षेत्रांत किमान १० वी पास. |
| ३ | पात्रता परीक्षा | १ | महिला प्रधान एजन्सीसाठी [illegible] महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळातर्फे परीक्षा घेण्यांत येईल. या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्रआवश्यक त्या कागदपत्रा बरोबर सादर करणे आवश्यक आहे. सदर परिक्षा १ जून २००५ पासून घेण्यात येईल. तोपर्यंत १ जानेवारी २००५ पासून बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाची परिक्षा संबंधीत ठिकाणी सह /उप /सहाय्यक संचालकांच्या नियंत्रणाखाली पार पडेल. [illegible] |
| ४ | वयोमर्यादा | | १८ ते ६० वर्षे [illegible] |
| ५. | सुरक्षा ठेव | १ | रु. १०००/- राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र तारण ठेवणे. [illegible] २ एप्रिल २००५ पासून टपाल कार्यालयातून जारी व तारण करण्यात आलेली डी-मॅट स्वरुपातच प्रमाणपत्रे स्वीकारण्यात यावीत. |
| | | २ | प्रत्येकी रु १० हजाराचे २ जामीनदार (विहीत नमुन्यातील फॉर्म भरुन घेणे.) |
| ६. | वेबसाईट सभासदत्त्व | | ज्या महीला एजंटांकडे फक्त महीला प्रधान एजन्सी आहे अशा एजंटांना सभासद शुल्क भरावे लागणार नाही. तथापी महानगर पालीका क्षेत्रातील एजंटांना त्यांचा गुंतवणूक अहवाल विहीत नमुन्यात दरमहा वेबसाईटवर भरणे आवश्यक राहील. एजंटाने सलग ३ महीने अहवाल भरला नाही तर एजंन्सी रद्द करण्याची कार्यवाही सुरू केली जाईल. |
| ७ | प्रतिज्ञापत्र | १ | अर्जदार स्वतः राज्य अथवा केंद्र शासनाच्या किंवा त्यांच्या अखत्यारितील कार्यालयात, तसेच त्यांचे (जवळचे) नातेवाईक पोष्टाच्या, अल्पबचत संचालनालयाच्या, राष्ट्रीय बचत संघटन कार्यालयाच्या किंवा राष्ट्रीयकृत बँकेच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कार्यालयांत सेवेला नसल्या बाबतचे प्रतिज्ञापत्र. रु.२०/- चे स्टॅम्पपेपर किंवा फ्रँकींग केलेल्या पेपरवर सक्षम अधिका-याचे सही शिक्क्यानिशी देणे आवश्यक आहे. |
| | | २ | अर्जदाराचे जवळचे नातेवाईक केंद्र व राज्य शासनाच्या सेवेत असतील तर तसे संबंधीत कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. |
| ८ | चारित्र्य व वर्तणूक प्रमाणपत्र. | | राजपत्रित अधिकारी किंवा माध्यमिक शाळा मुख्याध्यापक किंवा कॉलेज प्राचार्य यापैकी कोणत्याही दोन व्यक्तींचे मागील ५ वर्षांपासून ओळखत असले बाबत चारित्र व वर्तणूकी संबंधिचे प्रमाणपत्र तसेच विद्यमान एजन्सीचे नुतणीकरण तसेच पुनःजारीकरण करताना समाजातील कोणत्याही दोन प्रतिष्ठित व्यक्तींकडून ५ वर्षापासूनचे परिचयाचे वर्तणूकीचे प्रमाणपत्र अभिकर्त्यांनी सादर करणे आवश्यक आहे. |
| ९ | राहण्याच्या पत्त्याबद्दल. | १ | रेशनकार्ड(ज्यामध्ये नांव समाविष्ट आहे.)किंवा स्वतःचे नांवावर असलेले वीज बिल अथवा टेलिफोन बील अथवा मिळकतकर पावती. |
| १० | एजन्सीची मुदत. | १ | एजन्सी मुदत ३ वर्षासाठी असेल व एजंटांच्या कामाचे कार्यक्षेत्र नेमून दिलेल्या क्षेत्रासाठी मर्यादीत असेल. |
| ११ | एजन्सीचे नुतनीकरण. | १. | एजन्सीची मुदत ३ वर्षाची असेल तथापि एजन्सी घेतल्यापासून ३ वर्षाचे आत महानगर पालीका क्षेत्रातील एजंटांनी १०० नवीन खाती उघडणे बंधन कारक असून दरमहाचा भरणा रु.१०,०००/- असणे आवश्यक आहे. महानगर पालीका क्षेत्राशिवाय इतर क्षेत्रातील एजंटांनी ५० नवीन खाती उघडणे आवश्यक असून दरमहाचा भरणा रु.५,०००/- असणे आवश्यक आहे. नुतणीकरण करतानाचे वेळी सुरक्षाठेवीची मुदत संपली असेल तर त्या बाबीची पुर्तता करणे एजंटास बंधनकारक आहे. |
| | | २. | वरील अटींची पूर्तता न केल्यास एजन्सीचे नुतनीकरण करुन देण्यांत येणार नाही. |
| | | ३. | एजन्सीचे नुतनीकरण करुन घेण्यासाठी एजंटाने ४५ दिवस अगोदर नेमणूक अधिका-याकडे सर्व कागदपत्रासह अर्ज करणे बंधनकारक आहे. तथापी काही अपरिहार्य कारणामुळे एजंट नुतनीकरणासाठी |

४५ दिवस अगोदर अर्ज देऊ शकला नाही तरी त्याने एजंन्सीची मुदत संपण्यापुर्वी एजंन्सीचे नुतणीकरण करुन घ्यावे अन्यथा एजंन्सी रद्द होईल व केलेल्या गुंतवणूकीचे कमिशन घेतले असल्यास ते वसुल करण्यात येईल.

४. वार्षिक गुंतवणूक अहवाल विहीत नमुन्यांत नेमणूक अधिका-यास दरवर्षी दिनांक १० एप्रिल पर्यंत देणे बंधन कारक आहे.

५. शैक्षणिक पात्रता, प्रवेश पात्रता परिक्षा व वयोमर्यादा याबाबतचे निकष विद्यमान एजंन्सीचे नुतणीकरण तसेच पुनःजारीकरण याबाबत लागू असणर नाही.

१२. शासनाचा विशेष अधिकार — कोणत्याही कारणाशिवाय एजंटांची एजंन्सी रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती अधिका-यास / शासनास असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

सु.तु.शें.

(सु. तु. शेंठ)
सह संचालक, अल्पबचत व
अवर सचिव, वित्त विभाग

प्रत

१. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा व अनुज्ञयता) मुंबई/नागपुर
२. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
३. सह सचिव, (अर्थ) भारत सरकार, वित्त मंत्रालय, आर्थिक कार्य विभाग, नवी दिल्ली ११०००१.
४. डेप्युटी डायरेक्टर जनरल (फायनान्सीयल सर्व्हीस) डाक भवन, संसद मार्ग, नवी दिल्ली ११०००१.
५. मुख्य प्रबंधक, डीजीबीए, स्टेट बॅंक ऑफ इंडीया, मुख्य कार्यालय, सरकारी व बॅंक लेखा विभाग, मुंबई
६. प्रधान पोष्ट मास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई ४००००१.
७. उप महासंचालक, (पीएएफ) टपाल विभाग, डाक भवन, संसद मार्ग, नवी दिल्ली ११०००१.
८. महाप्रबंधक, भारतीय रिझर्व बॅंक (मध्यवर्ती लेखा विभाग), नागपुर
९. आयुक्त, राष्ट्रीय बचत संस्था, ४ था मजला सीजीओ कॉप्लेक्स, सेमीनारी हिल्स, नागपुर ४४०००१.
१०. प्रादेशिक संचालक, राष्ट्रीय बचत संस्था, मुंबई / नागपुर
११. सर्व विभागीय आयुक्त

A:\MPKBY-GR.doc

१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५. सहसंचालक, अल्पबचत (बृ)/उपसंचालक, अल्पबचत (बृ)
१६. सर्व विभागीय उपसंचालक, अल्पबचत
१७. सर्व उप संचालक/ सहाय्यक संचालक, अल्पबचत (बृहन्मुंबईसह)
१८. लेखाधिकारी, अल्पबचत, मुंबई
१९. कक्ष अधिकारी, (प्रशासन/ अर्थ)
२०. निवड नस्ती

AAMPK RY GR.doc

**महत्वाचे/ अत्यंत तातडीचे/समय मर्यादा**

क्र. अबवि११.००/प्र.क्र.६१७/०५/विकास

अल्पबचत संचालनालय, वित्त विभाग
नवीन प्रशासकीय भवन, ८ वा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०००३२.
दिनांक १.१२.२००५

प्रति
सह संचालक, अल्पबचत (बृ)
सर्व विभागीय उप संचालक, अल्पबचत
उप संचालक, अल्पबचत, ठाणे / पुणे
सर्व सहाय्यक संचालक, अल्पबचत

विषय : दिनांक १.१२.२००५ पासून कोणत्याही प्रकारची नवीन एजंन्सी न देणेबाबत

मा. आयुक्त, यांनी आदेशीत केलेनुसार आपणाला कळविण्यात येते की, दिनांक १.१२.२००५ पासुन कोणत्याही प्रकारच्या नवीन एजंटांची नेमणूक करण्यात येऊ नये. एजंन्टांसाठी परीक्षा पध्दत सुरु झाल्यापासून घेतलेल्या सर्व परीक्षाचे पेपर्स एजंन्सीनिहाय सीलबंद करुन ठेवण्यात यावेत. तसेच परीक्षा पध्दत सुरु झाल्यापासून देण्यात आलेल्या एजंन्टांचे कागदपत्र (एजंन्सीसाठीचे अर्ज, प्रतिज्ञापत्र, चारित्र / वर्तणूक दाखला, इत्यादी.....) एजंन्सी प्रकारनिहाय व एजंन्सी क्रमांकानुसार व्यवस्थित ठेवण्यात यावेत व तसा अहवाल ई - मेल व्दारे तसेच दुरध्वनीव्दारे संचालनालयास करावा.

दिनांक ३०.११.२००५ अखेर ज्या एजंन्सी दिलेल्या आहेत त्या तीन्ही प्रकारच्या एजंन्सीचा दि.३०.११.२००५ रोजीचा शेवटचा एजंन्सी क्रमांक संचालनालयाला ई - मेलव्दारे तसेच दुरध्वनीवर त्वरीत द्यावयाचा आहे. तसेच यापुढे नवीन एजंन्सी देण्याबाबतच्या परीक्षेसाठी कुणाचाही अर्ज स्वीकारण्यात येऊ नये किंवा स्वीकारलेल्या अर्जासाठी परीक्षा आयोजीत करण्यात येऊ नये. अद्यापपर्यंत नेमण्यात आलेल्या एजंन्टांचे रेकॉर्ड, तारण ठेवलेल्या NSC सह अद्ययावत करण्याचे काम त्वरीत हाती घेण्यात यावे. तसेच ज्यांची परीक्षा घेण्यात आली परंतू ज्या उतीर्ण उमेदवारांना एजंन्सी देण्यात आलेली नाही अशा उतीर्ण उमेदवारांची एजन्सीनिहाय संख्या संचालनालयाला ई - मेलव्दारे/ फोन द्वारे त्वरीत देणे.

RDNS ने नेमलेल्या एजंन्सीचे नुतणीकरण मात्र पुर्वी प्रमाणेच आपल्याकडील पुढील नवीन क्रमांक देऊन सुरु ठेवावयाचे आहे.

(स्वाक्षरी)
उप संचालक, अल्पबचत (विकास)

जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा.
म.व.क्र.: SS
शाखा:- 15 DEC 2005
लिपिक:
प्र. अ.
प्र. लि./नि.उ.जि./जिल्हाधिकारी

9 DEC 2005

शासन संदर्भ ९८८

अल्पबचत / महिला प्रधान/ पी.पी.एफ.
एजन्सीचे नुतनीकरण मुदतीनंतर
विलंबाने करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,

अल्पबचत संचालनालय,
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

शासन निर्णय, क्र. अब ११.००/प्र.क्र.१६/०७/विकास,
दिनांक : २ मे, २००८.

वाचा :- १. शासन निर्णय, क्र.अबवि ११.००/प्र.क्र.६१७/विकास,
दि. ३ जानेवारी २००५
२. शासन निर्णय, क्रमांक अबवि /प्र.क्र.६१७/अब (विकास ),
दि. ३ जानेवारी २००५.
३. शासन निर्णय, क्र. अबवि ११.००/प्र.क्र.४७७/२००४/अब (विकास ),
दि. २९ डिसेंबर २००४.

**प्रस्तावना :-**

अल्पबचतीच्या तिन्ही एजन्सी ( एस.ए.एस., महिला प्रधान, पी.पी.एफ. ) चे नवीन एजन्सी देणे, एजन्सीचे नुतनीकरण करणे, एजन्सी रद्द करणे यासंबंधीचे धोरण शासन निर्णय, वाचा अनुक्रमे १,२, व ३ अन्वये निर्गमित केलेले आहेत. उपरोक्त वाचा शासन निर्णयान्वये एजन्सी नुतनीकरणासाठी संबंधित एजन्टाने नुतनीकरणाची सर्व कागदपत्रे पूर्ण करुन नुतनीकरण दिनांकापूर्वी ४५ दिवस अगोदर कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. तसेच ४५ दिवस अगोदर काही कारणामुळे एजंट कागदपत्रे सादर करु शकला नाही तर कमीत कमी वैध दिनांकापूर्वी तरी सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त प्रमाणे कोणंत्याही कारणामुळे एजंट विहित मुदतीत नुतनीकरणाचे अर्ज सादर करु शकला नाही तर अशा एजंटांची एजन्सी शासन निर्णयाच्या अनुषंगाने रद्द होत आहेत व त्या अनुषंगाने राज्यभरातून ब-याच एजंटाचे अर्ज नुतनीकरण करुन देण्यासाठी शासन स्तरावर प्राप्त होत आहेत. त्या अनुषंगाने सर्वकष विचार करुन पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

काही कारणांमुळे एजंटाने एजन्सीचे नुतनीकरण मुदत संपण्यापुर्वी करुन घेतले नाही तर त्याची कारणे नमूद करुन एजन्सी मुदत संपल्यानंतर खालील अटींच्या अधिन राहून नुतनीकरण करुन दयावे.

१) एजन्सीची मुदत संपल्यानंतर एक वर्षाच्या आत जो एजंट एजन्सी नुतनीकरणासाठी कार्यालयाकडे लेखी अर्ज करेल अशा एजंटाची एजन्सी नुतनीकरणासाठी विचारात घेतली जाईल.
२) एजन्सीची मुदत संपल्यानंतर ते नुतनीकरण करुन देण्याच्या दिनांकापर्यंतचा मधला कालावधी वगळण्यात येऊन हा कालावधी एजन्सीचा कार्यरत कालावधी समजण्यात येणार नाही. तसेच याची नोंद एजन्सी रजिस्टरवर व प्राधिकार पत्रावर घेण्यात येईल.



To/ESt
Pl. keep in S.O. file
Albeel
17/5/08

३) एजन्सीच्या मुदतीनंतर ते एजन्सीचे नुतनीकरण करुन देण्याच्या कालावधीत एजंटाने काही गुंतवणूक करुन कमिशन किंवा अन्य आर्थिक लाभ घेतले असतील तर ते एजंटाने संबंधिताकडे जमा करुन तशी पावती सादर करणे आवश्यक राहील.

४) संबंधित एजंटाने विहित मुदतीत नुतनीकरण करुन घेतले नाही म्हणून त्यांनी जेवढी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून ठेवली आहे तेवढी रक्कम म्हणजेच एस.ए.एस. / पी.पी.एफ. एजंटांसाठी रु. २०००/- व महिला प्रधान एजंटासाठी रु.१०००/- इतका दंड आकारण्यात येईल.

५) एजंटाने एजन्सीच्या मुदतीनंतर ते नुतनीकरण करुन देण्याच्या कालावधीत काही गैरव्यवहार आर्थिक अनियमितता केलेली नाही तसेच याबाबत काही तक्रार आल्यास त्याची जबाबदारी एजंटाची असेल असे हमीपत्र एजंटाकडून घेण्यात येईल.

६) तसेच सदरचा शासन निर्णय हा आर्थिक अफरातफरीच्या प्रकरणातील एजंटांच्या एजन्सीबाबतीत लागू असणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अविचेंदवणकर

( अ.वि. चेंदवणकर )
सह संचालक, अल्पबचत व
अवर सचिव, वित्त विभाग.

प्रत,

१. महालेखापाल महाराष्ट्र ,१/२ (लेखा परीक्षा व अनुज्ञेयता )मुंबई/नागपूर
२. सह सचिव (अर्थ ) भारत सरकार, वित्त मंत्रालय, आर्थिक कार्य विभाग , नवी दिल्ली ११०००१
३. डेप्युटी डायरक्टर जनरल (फायनान्सीयल सर्व्हिस) डाक भवन,संसद मार्ग, नवी दिल्ली १०००१
४. मुख्य प्रबंधक, डीजीबीए,स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य कार्यालय, सरकारी व बँक लेखा विभाग,मुंबई
५. प्रधान पोस्ट मास्तर,जनरल,महाराष्ट्र सरकार, मुंबई ४०० ००१
६. उप महासंचालक, (पीएफ)टपाल विभाग,डाक भवन,संसद मार्ग नवी दिल्ली ११०००१
७. महाप्रबंधक भारतीय रिझर्व्ह बँक (मध्यवर्ती लेखा विभाग) नागपूर
८. आयुक्त, राष्ट्रीय बचत संस्था,४ था मजला, सीजीओ कॉम्प्लेक्स सेमिनारी हिल्स,नागपूर ४४०००१
९. प्रादेशिक संचालक,राष्ट्रीय बचत संस्थान, मुंबई/नागपूर
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. सह संचालक, अल्पबचत (बृ.) /उप संचालक,अल्पबचत (विकास )
१३. सर्व सहायक संचालक, अल्पबचत (बृहन्मुंबईसहीत )
१४. लेखा अधिकारी, अल्पबचत, मुंबई
१५. कक्ष अधिकारी, प्रशासन/अर्थ
१६. निवड नस्ती.

अल्पबचत , महिला प्रधान व पी.पी.एफ.
एजंट नेमणूक व नूतनीकरण बाबत . . . .

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
अल्पबचत संचालनालय, वित्त विभाग
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला मंत्रालयासमोर मुंबई ४०००३२
शासन निर्णय क्रमांकः अबवि ११.००/ प्र. क्र. ६१७ / विकास, दिनांक २६ आगष्ट २००८.

शासन निर्णय क्रमांकः अबवि ११.००/ प्र. क्र. ६१७ / विकास, दिनांक ३-१-२००५

वाचाः- १) शासन निर्णय क्रमांकः अबवि ११.००/ प्र. क्र. ६१७ / विकास, दिनांक ३-१-२००५
२) शासन निर्णय क्रमांकः अबवि ११.००/ प्र. क्र ४७७ / २००४ / विकास, दिनांक २९-१२-२००४
३) शासन निर्णय क्रमांकः अबवि ११.००/ प्र. क्र ४७७ / २००४ / विकास, दिनांक ३१-१२-२००७.
४) शासन निर्णय क्र.अबवि ११.००/ वेबसाईट सभासद /प्र.क्र.२३ / विकास,

**प्रस्तावना**

अल्पबचत योजने अंर्तगत असणा-या तीन प्रकारच्या एजंन्सी नेमणूकीचे व नूतनीकरणाचे नियम व अटी वरील वाचा अनुक्रमांक १ ते ३ शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. तथापि सदर एजंन्सीच्या अनुषंगाने काही बदल वरील वाचा क्रमांक ४ च्या शासन निर्णयान्वये केलेले आहेत. सबब उपरोक्त तीन्ही प्रकारच्या एजंन्सीच्या नियम व अटीमध्ये बदल करणे आवश्यक झाले असल्यामुळे, त्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन पुरक पत्रक**

१ ) अल्पबचत , महिला प्रधान व पी.पी.एफ. एजंटांना अल्पबचत वेबसाईटचे सभासद होणे बंधनकारक राहणार नाही. तसेच गुंतवणूकीची माहिती वेबसाईटवर नोंदणे आवश्यक राहणार नाही.

२ ) वरील तिन्ही प्रकारच्या एजंन्सीसाठी घेण्यात येणारी परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळातर्फे ऑन लाईन घेण्यात येणार नाही. सदरची परीक्षा संबंधित जिल्हयाचे ठिकाणी सहाय्यक संचालक अल्पबचत यांचे मार्फत घेण्यात येईल.

३) ज्या महिला प्रधान व पी.पी.एफ. एजंटाची एजंन्सी, एजंटाचा मृत्यू - वयोवृध्दत्व - गंभीर स्वरुपाचे आजारपण - स्थलांतर इत्यादी कारणामुळे रध्द झाली असल्यास अशा एजंटाकडील आर.डी. व पी.पी.एफ. खातेदारांची गैरसोय होऊ नये, म्हणून एजंटाच्या संमतीने त्याच्या नातेवाईकांना एजंन्सी नेमणूक नियमांच्या आधिन राहून नवीन एजंन्सी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदरची सुविधा फक्त महिला प्रधान व पी.पी.एफ. एजंन्सी कीरताच लागू असेल.

४) अल्पबचत एजंटांनी प्रत्येक वर्षी महानगर पालीका क्षेत्रात ५ लाख , नगरपालीका क्षेत्रात २ लाख व ग्रमीण क्षेत्रात १ लाख याप्रमाणे गुंतवणूक मिळविणे बंधनकारक राहील. एजंन्सी नुतनीकरणाचे वेळी ज्या अल्पबचत एजंटाची ३ वर्षातील सरासरी गुंतवणूक वरीलप्रमाणे नसेल तर त्यांच्या एजंन्सीचे नुतनीकरण करुन न देता एजंन्सी रध्द करण्यात येईल.

जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा.
अल्पबचत शाखा
15 SEP 2008
लिपीक अधिकारी

५) त्याचप्रमाणे महानगर पालीका क्षेत्रातील महिला प्रधान एजंटाकडे १०० खाती चालू असून दरमहाचा भरणा रुपये १० हजार असणे आवश्यक आहे. महानगर पालीका क्षेत्राशिवाय इतर क्षेत्रातील महिला प्रधान एजंटाकडे ५० खाती चालू असून दरमहाचा भरणा रुपये ५ हजार असणे आवश्यक आहे. सदर अटींची पूर्तता न झाल्यास एजंन्सीचे नूतनीकरण करुन न देता त्यांची एजंन्सी रध्द करण्यात येईल.

६) पी.पी.एफ. एजंटाच्या बाबतीत त्यांनी ३ वर्षाच्या कालावधीत कमीत कमी ३० नवीन खाती उघडणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अ. वि.चेंदवणकर)
सह-संचालक अल्पबचत व अवर सचिव
वित्त विभाग

प्रत

१. डेप्युटी डायरेक्टर जनरल (फायनान्सीयल सर्व्हीस) डाक भवन, संसद मार्ग, नवी दिल्ली ११०००१.
२. मुख्य प्रबंधक, डीजीबीए, स्टेट बॅंक ऑफ इंडीया, मुख्य कार्यालय, सरकारी व बॅंक लेखा विभाग, मुंबई
३. प्रधान पोष्ट मास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई ४०००0१.
४. उप महासंचालक, (पीएफ) टपाल विभाग, डाक भवन, संसद मार्ग, नवी दिल्ली ११०००१.
५. आयुक्त, राष्ट्रीय बचत संस्था, ४ था मजला सीजीओ काप्लेक्स, सेमीनारी हिल्स, नागपुर ४४०००१.
६. प्रादेशिक संचालक, राष्ट्रीय बचत संस्था, मुंबई / नागपुर.
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सह संचालक, अल्पबचत (बृ)
९. सर्व सहाय्यक संचालक, अल्पबचत (बृहन्मुंबईसह)
१०. कक्ष अधिकारी, (प्रशासन/ अर्थ)
११. निवड नस्ती

महिला प्रधान क्षेत्रीय बचत योजना (MPKBY)
नेमणूक / नूतनीकरण व रध्द करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
अल्पबचत संचालनालय,.नवीन प्रशासन भवन,
८ वा मजला, मंत्रालया समोर , मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक अबवि / प्र. क्र.६१७ /अब (विकास), दिनांक ३० मे २००९.

वाचा-(१) समक्रमांकाचा दिनांक ३ जानेवारी २००५ चा शासन निर्णय
(२) समक्रमांकाचा दिनांक ७ एप्रिल २००८ चा शासन निर्णय
(३) शासन निर्णय क्रमांक - आढावा १००८ / प्र.क्र.१०८ / ०८ /अबप्र
दिनांक १५ मे २००९

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ च्या शासननिर्णयान्वये महिला प्रधान क्षेत्रीय बचत योजना एजंन्सीसाठी नियुक्ती / नुतनीकरण व रध्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. सदरचे अधिकार जिल्हाधिकारी हे सहाय्यक संचालक यांना प्रदान करु शकतात. तसेच बृहमुंबई क्षेत्रात हे अधिकार सहसंचालक अल्पबचत बृहमुंबई यांना देण्यात आलेले आहेत. तथापि संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये मुंबई- ठाणे- पुणे-नाशिक-अमरावती-नागपूर-औरंगाबाद हे जिल्हे वगळता इतर जिल्हयातील सहाय्यक संचालकांची पदे रध्द करण्यात आलेली आहेत. तसेच बृहमुंबई क्षेत्रातील सह संचालक अल्पबचत हे पदही रध्द करण्यात आलेले आहे सबब सदरचे अधिकाराबाबत पुन्हा फेररचना करण्याचे शासनाच्या विचाराधिन होते. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय**

३) सदरचे अधिकार विभागिय जिल्हयाचे सहाय्यक संचालक अल्पबचत यांना असतील. सदरचे नूतनीकरण संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने करावयाचे आहे.

४) बृहमुंबई क्षेत्रासाठी हे अधिकार उप संचालक अल्पबचत बृहमुंबई यांना असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(अ. वि. चेंदवणकर)
सह संचालक, अल्पबचत व
अवर सचिव, वित्त विभाग

- 8 JUN 2009

D:RPGMPKBY-GR.doc

प्रत -

१ महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा व अनुज्ञयता) मुंबई/नागपुर

२ निवासी लेखा अधिकारी, मुंबई

३ सह सचिव, (अर्थ) भारत सरकार, वित्त मंत्रालय, आर्थिक कार्य विभाग, नवी दिल्ली ११०००१.
डेप्युटी डायरेक्टर जनरल. (फायनान्सीयल सर्व्हीस) डाक भवन, संसद मार्ग, नवी दिल्ली ११०००१.

४ मुख्य प्रबंधक, डीजीबीए, स्टेट बँक ऑफ इंडीया, मुख्य कार्यालय, सरकारी व बँक लेखा विभाग, मुंबई

५ प्रधान पोष्ट मास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई ४०००01.

६ उप महासंचालक, (पीएफ) टपाल विभाग, डाक भवन, संसद मार्ग, नवी दिल्ली ११०००१.

७ महाप्रबंधक, भारतीय रिझर्व बँक (मध्यवर्ती लेखा विभाग), नागपुर

८ आयुक्त, राष्ट्रीय बचत संस्था, ४ था मजला सीजीओ कॉम्प्लेक्स, सेमीनारी हिल्स, नागपुर ४४०००१.

९ प्रादेशिक संचालक, राष्ट्रीय बचत संस्था, मुंबई / नागपुर

१० सर्व विभागीय आयुक्त

११ सर्व जिल्हाधिकारी

१२ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१३ सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१४ सहसंचालक, अल्पबचत (बृ)/उपसंचालक, अल्पबचत (बृ)

१५ सर्व उप संचालक / सहाय्यक संचालक, अल्पबचत (बृहन्मुंबईसह)

१६ लेखाधिकारी, अल्पबचत, मुंबई

१७ कक्ष अधिकारी, (प्रशासन / अर्थ)

१८ निवड नस्ती

अल्पबचत अधिकत अभिकर्ते (SAS)
नेमणूक / नूतनीकरण व रध्द करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
अल्पबचत संचालनालय,.नवीन प्रशासन भवन,
८ वा मजला, मंत्रालया समोर , मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक अबवि / प्र. क्र.६१७ /अब (विकास), दिनांक ३० मे २००९.

वाचा-(१) समक्रमांकाचा दिनांक ३ जानेवारी २००५ चा शासन निर्णय
(२) समक्रमांकाचा दिनांक ३ एप्रिल २००८ चा शासन निर्णय
(३) शासन निर्णय क्रमांक - आढावा १००८ / प्र.क्र.१०८ / ०८ /अबप्र
दिनांक १५ मे २००९

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ च्या शासननिर्णयान्वये अल्पबचत एजंन्सीसाठी नियुक्ती / नुतनीकरण व रध्द करण्याचे अधिकार सहाय्यक संचालक अल्पबचत यांना देण्यात आलेले आहेत. तथापि संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये मुंबई- ठाणे- पुणे-नाशिक-अमरावती-नागपूर-औरंगाबाद हे जिल्हे वगळता इतर जिल्हयातील सहाय्यक संचालकांची पदे रध्द करण्यात आलेली आहेत. सबब सदरचे अधिकाराबाबत पुन्हा फेररचना करण्याचे शासनाच्या विचाराधिन होते. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय**

१) सदरचे अधिकार विभागिय जिल्हयाचे सहाय्यक संचालक अल्पबचत यांना असतील. सदरचे नूतनीकरण संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने करावयाचे आहे.
२) बृहमुंबई क्षेत्रासाठी हे अधिकार सहाय्यक संचालक अल्पबचत बृहमुंबई (अभिकरण) यांना असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(अ. वि. चेंदवणकर)
सह संचालक, अल्पबचत व
अवर सचिव, वित्त विभाग

15/6/09

प्रत -

१ महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा व अनुज्ञयता) मुंबई/नागपुर
२ निवासी लेखा अधिकारी, मुंबई

D:\RPG\MPKBY-GR.doc

३ सह सचिव, (अर्थ) भारत सरकार, वित्त मंत्रालय, आर्थिक कार्य विभाग, नवी दिल्ली ११०००१.

४ डेप्युटी डायरेक्टर जनरल (फायनान्सीयल सर्व्हीस) डाक भवन, संसद मार्ग, नवी दिल्ली ११०००१.

५ मुख्य प्रबंधक, डीजीबीए, स्टेट बँक ऑफ इंडीया, मुख्य कार्यालय, सरकारी व बँक लेखा विभाग, मुंबई

६ प्रधान पोष्ट मास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई ४००००१.

७ उप महासंचालक, (पीएएफ) टपाल विभाग, डाक भवन, संसद मार्ग, नवी दिल्ली ११०००१.

८ महाप्रबंधक, भारतीय रिझर्व बँक (मध्यवर्ती लेखा विभाग), नागपुर

९ आयुक्त, राष्ट्रीय बचत संस्था, ४ था मजला सीजीओ कॉप्लेक्स, सेमीनारी हिल्स, नागपुर ४४०००१.

१० प्रादेशिक संचालक, राष्ट्रीय बचत संस्था, मुंबई / नागपुर

११ सर्व विभागीय आयुक्त

१२ सर्व जिल्हाधिकारी

१३ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१४ सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१५ सहसंचालक, अल्पबचत (बृ)/उपसंचालक, अल्पबचत (बृ)

१६ सर्व उप संचालक / सहाय्यक संचालक, अल्पबचत (बृहन्मुंबईसह)

१७ लेखाधिकारी, अल्पबचत, मुंबई

१८ कक्ष अधिकारी, (प्रशासन / अर्थ)

१९ निवड नस्ती